महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/मभापं/२०२१/ ५८९८ दिनांक : 27 DEC 2021

प्रति,
प्राचार्य / संचालक
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित/विनाअनुदानीत
पदविका, पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था
पुणे विभाग

**विषय — दिनांक १४ जानेवारी ते २८ जानोवारी या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करणेबाबत**

संदर्भ — शासन परिपत्रक क्रमांक : मभापं-२०२१/प्र.क्र.५३६/भाषा-२, दि. २२ डिसेंबर, २०२१

उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वये कळविण्यात येते की, मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी तिचे संवर्धन करण्यासाठी **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२२ या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. या संदर्भातील दि. २२-१२-२०२१ चे परिपत्रक सोबत जोडले आहे. सोबत जोडलेल्या परिपत्रकाचे अवलोकन करुन परिपत्राकात नमूद केल्यानुसार दि.१४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२२ या कालवधीत कार्यक्रम आयोजित करुन **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** साजरा करण्याचे निर्देश आपल्या संस्थेतील / कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

सोबत - १) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडून दि. २४-१२-२०२१ रोजीचा प्राप्त झालेला ई-मेल संदेश
२) संदर्भीय शासन परिपत्रक

प्रत -: या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी

Directorate Of Technical Education Maharashtra, Mumbai, India

Technical Education regional office Pune <ropune@dtemaharashtra.gov.in>

# Fwd: Fw: दिनांक 14 जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करणेबाबत.

**DESK16 Desk Officer** <desk16@dtemaharashtra.gov.in> 24 December 2021 at 10:33
To: romumbai REGIONAL OFFICE <romumbai@dtemaharashtra.gov.in>, Technical Education regional office Pune <ropune@dtemaharashtra.gov.in>, roaurangabad regional office <roaurangabad@dtemaharashtra.gov.in>, roamravati regional office <roamravati@dtemaharashtra.gov.in>, ronagpur regional office <ronagpur@dtemaharashtra.gov.in>, ronashik regional office <ronashik@dtemaharashtra.gov.in>, DESK4 Desk Officer <desk4@dtemaharashtra.gov.in>, DESK12 Desk Officer <desk12@dtemaharashtra.gov.in>

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
24 DEC 2021
आवक क्र. 9644

Assistant Director (NT),
Desk-16, DTE, Mumbai.
02230233476

---------- Forwarded message ---------
From: **Dr. Abhay Wagh** <director@dtemaharashtra.gov.in>
Date: Thu, Dec 23, 2021 at 5:52 PM
Subject: Fwd: Fw: दिनांक 14 जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करणेबाबत.
To: DESK16 Desk Officer <desk16@dtemaharashtra.gov.in>, S.G. Randive <sgrandive@dtemaharashtra.gov.in>

---------- Forwarded message ---------
From: **Vikas Chandra Rastogi** <psec.higheredu@maharashtra.gov.in>
Date: Thu, Dec 23, 2021 at 5:01 PM
Subject: Fw: दिनांक 14 जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करणेबाबत.
To: director@dtemaharashtra.gov.in <director@dtemaharashtra.gov.in>, satish.tidke@nic.in <satish.tidke@nic.in>

---

**From:** Rajashri Bapat Section Officer <rajashri.bapat@nic.in>
**Sent:** Thursday, December 23, 2021 4:47 PM
**To:** Sujata Saunik; Anand Limaye; psec.schedu@maharashtra.gov.in; Manoj Saunik; Baldev Singh; Manisha Verma; ceo.maharashtra@eci.gov.in; Ashwani Kumar; Jagdish Gupta; Mahesh Pathak; Manoj Saunik; Neeraj P. Dhote; Debashish Chakrabarty; Shyam Tagade; Principal Secretary PHD; Shri Anup Kumar Yadav; Manisha Patankar Mhaiskar; Dinesh Waghmare; S Tagade1; Ashish Kumar Singh; Eknath Dawale; Saurabh Vijay; Dilip Pandharpatte; Anoop Kumar; Parrag Jaiin-Nainutia; Vikas Chandra Rastogi; Valsa Nair Singh; Shri Rajesh Kumar; Sanjeev Jaiswal; Abha Shukla; Milind mhaiskar; B.Venugopal Reddy; RAJESH KUMAR; I.A.Kundan; Sadashiv S. Salunkhe; Vijay Waghmare; Baswant Swami, Secretary (PC); Ajay Kohirkar, Secretary (CAD); dg.dgipr; Secretary SPC; acs.mr@maharashtra.gov.in
**Subject:** दिनांक 14 जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करणेबाबत.

महोदय / महोदया,

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन करण्यासाठी **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक 14 जानेवारी ते 28 जानेवारी, 2022 या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. यासंदर्भातील दि. 22.12.2021 चे परिपत्रक सोबत जोडले आहे.

सदर परिपत्रकात नमूद केल्यानुसार कार्यक्रम  दिनांक 14 जानेवारी ते 28 जानेवारी 2022 या कालावधीत आयोजित करून " **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा** " साजरा करण्याचे निदेश आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना व अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात यावेत, ही विनंती.

आपली विश्वासू,

( राजश्री बापट )
कक्ष  अधिकारी, महाराष्ट्र शासन

--
**Dr. Abhay Wagh**
Director
Directorate of Technical Education
Maharashtra State,  Mumbai
www.dtemaharashtra.gov.in

---

**पंधरवडा शासन निर्णय.pdf**
351K

दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२२
या कालावधीत मराठी भाषा संवर्धन
पंधरवडा साजरा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**मराठी भाषा विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : मभापं-२०२१/प्र.क्र.१३६/भाषा-२**

८ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुबई-४०० ०३२,
दिनांक: २२ डिसेंबर, २०२१

वाचा :-

१) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभापं-२०१५/प्र.क्र.७०/भाषा-२, दि.२२.०७.२०१५

२) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. मभापं-२०१९/प्र.क्र.१११/भाषा-२, दि. १८.०९.२०२०

प्रस्तावना-

राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे,केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये, मंडळे/महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालये इत्यादी सर्व कार्यालये/संस्थांमधून राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा करण्यात येतो. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या विभागाच्या मुख्य धोरणास अनुसरुन "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्यासाठी दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात येतात. तथापि, सध्याच्या कोविड १९ - ओमायक्रॉन या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून काही निर्बंध पाळणे आवश्यक आहे. त्यामुळे या पंधरवड्याच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष कार्यक्रम करता येणार नसले तरी, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने साजरे करता येतील. सदर कार्यक्रम साजरे करताना सामाजिक माध्यमे, दूरचित्रवाणी इ. माध्यमांच्या प्रभावी अंमलबजावणीतून मराठीच्या प्रचार व प्रसारासाठी कार्यक्रम आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त सुयोग्य कार्यक्रम आयोजित करुन पंधरवडा समारंभपूर्वक साजरा करण्यासाठी सर्व कार्यालयांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

अ) **राज्यातील सर्व कार्यालयांनी करावयाचे कार्यक्रम -:**

ऑनलाईन कार्यक्रम ही कोविडच्या तथा आधुनिक तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर काळाची गरज आहे. ही बाब विचारात घेता, मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी खालीलप्रमाणे जास्तीत जास्त कार्यक्रम

ऑनलाईन पध्दतीने साजरे करण्यात यावेत. **(जिथे प्रत्यक्षरीत्या कार्यक्रम करणे शक्य आहे, तिथे केंद्र शासन/राज्य शासन यांनी आखून दिलेल्या कोविड मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करुन कार्यक्रमांचे आयोजन करावे.)**

१) मराठी भाषेसंबंधी, वाङ्मयासंबंधी विविध परिसंवाद /व्याख्याने / कार्यशाळा /शिबीरे/ कविसंमेलने/ एकांकिका/ बालनाट्ये/ नाटके/ पुस्तक प्रकाशन समारंभ/ साहित्य पुरस्कार वितरण यांचे आयोजन करणे.

२) मराठी भाषेत निबंध/ प्रश्नमंजुषा/ कथाकथन/ चारोळीलेखन/ कथालेखन/ कवितालेखन/ हस्ताक्षर/ शुद्धलेखन/ वक्तृत्व/ घोषवाक्ये/ अभिवाचन/ वादविवाद/ अंताक्षरी/ शब्दकोडी/ मराठी साहित्यासंबंधी पुस्तकांचे रसग्रहण/ समीक्षण/ परिच्छेद अनुवाद इत्यादी स्पर्धा घेणे.

३) मराठी वाचन संस्कृती वाढावी यादृष्टीने मराठी भाषेतील अभिजात ग्रंथांचा परिचय करुन देण्यासाठी मराठी भाषेतील तज्ज्ञ नामवंत व्यक्ती/ लेखक/ वक्ते यांच्याकडून मार्गदर्शन, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन करणे.

४) ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथदिंडी, कथाकथन, काव्यवाचन, माहितीपट इत्यादी साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम करणे.

५) वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी असणाऱ्या मराठी भाषक व्यक्तींचा सत्कार, मुलाखती घेणे.

६) राज्यातील अमराठी भाषकांना मराठी भाषेचा सुलभ पध्दतीने परिचय करुन देण्याच्या दृष्टीने कार्यशाळा/ भाषेसंबंधी स्पर्धांचे आयोजन करणे.

७) मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांनी संकेतस्थळे, आकाशवाणी, दूरदर्शन, खाजगी दूरचित्रवाहिन्या, एफ.एम.रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप इ. अशा आधुनिक प्रसार माध्यमातून याबाबतचे दृक-श्राव्य संदेश प्रसारित करावेत.

८) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन यासाठी विविध मार्गांनी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव/ सत्कार करणे.

९) टंकलेखनाकरिता युनिकोड मराठीचा जास्तीतजास्त वापर करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करावे.

१०) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार या उद्दिष्टांसह रोजगारभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी खालील विषयावरील तसेच अशा स्वरुपाच्या अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१) अनुवादलेखन २) व्यावसायिक लेखन ३) पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया

४) स्व-प्रकाशन ५) ई-बुक ६) ऑनलाईन पुस्तक विक्री ७) लेखक प्रकाशन करार
८) संहिता लेखन ९) विकिपिडिया कार्यशाळा १०) शॉर्ट फिल्म/डॉक्युमेंटरी लेखन

११) डिजिटल साहित्य संमेलनाचे आयोजन करणे. तसेच मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्वांनी डिजीटल माध्यमाचा जास्तीत जास्त वापर करुन मराठीतील साहित्य स्वयंस्फुर्तीने वाचकांना पाठवावे.

१२) प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकाची जत्रा आयोजित करण्यात यावी. या जत्रेत लोक आपली पुस्तके नि:शुल्क किंवा स्वस्त दरामध्ये इतरांना देऊ शकतील. तसेच, या जत्रेदरम्यान मराठीच्या प्रचार व प्रसारासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१३) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार वर्जित प्रयोजने वगळता शासकीय कामकाज १००% मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. तर, त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये/सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा मराठी भाषा समितीमार्फत विविध उपक्रम राबवावेत तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, नियम, अधिनियम संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

१४) सर्व संस्थांनी सोशल मिडीयावर "मराठी वाचन कट्टा" निर्मिती करावी.

१५) सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी पंधरवड्याच्या निमित्ताने मराठी प्रचार/प्रसार/वाचन संस्कृतीच्या विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे.

१६) मराठी अभिजात दर्जाबाबत सर्वसामान्यांना माहिती व्हावी यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळाच्या समन्वयाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे.

**ब) राज्यस्तरावर साहित्य संस्थांच्या मदतीने वरील "अ" प्रमाणे करावयाची कार्यवाही :-**

राज्य स्तरावर वरील कार्यक्रम सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी संस्कृती मंडळ तथा राज्य मराठी विकास संस्था यांनी खालीलप्रमाणे साहित्य संस्थांची मदत घेऊन त्या साहित्य संस्थांसमोर दर्शविलेल्या जिल्ह्यात कार्यक्रम आयोजित करावेत .

| अ.क्र. | साहित्य संस्था | साहित्य संस्थेच्या अंतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर. |
| २ | मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर. |

| | | |
|---|---|---|
| ३ | विदर्भ साहित्य संघ, नागपूर | बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली |
| ४ | कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी | रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर, |
| ५ | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर | कोल्हापूर |
| ६ | मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई. | मुंबई शहर |

क) भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाईल ॲप) तसेच मराठी भाषा विभागाच्या व त्या अंतर्गत कार्यालयांच्या संकेतस्थळाबद्दलची माहिती भाषा पंधरवड्याच्या निमिताने शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांपर्यंत प्रसारीत करण्याची जबाबदारी चारही क्षेत्रीय कार्यालयांची राहील. चारही क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांच्या संकेतस्थळावर व फेसबुक पानावर या कार्यक्रमाची क्षणचित्रे प्रत्यक्षरित्या (Realtime) अद्ययावत करुन प्रसिध्दी द्यावी.

ड) सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई तसेच परिच्छेद "ब" येथे दर्शविलेल्या साहित्य संस्थांची मदत घेता येईल.

२. राज्यात तसेच जिल्हा स्तरावर त्यांच्या अखत्यारित असलेल्या कार्यक्षेत्रात वर दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे खालील कार्यालयांनी आयोजन करावे.

अ) मुंबई (मुख्यालय स्तरावर)- सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिपत्याखालील मुंबईतील शासकीय कार्यालये

आ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये

इ) सर्व जिल्हाधिकारी कार्यालये तसेच विविध विभागांच्या अधिपत्याखालील जिल्हास्तरीय कार्यालये

ई) मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)-तालुकास्तरावर, ग्रामीणस्तरावर

उ) शासनाच्या अखत्यारितील कार्यालये/मंडळे/महामंडळे/सार्वजनिक उपक्रम,स्थानिक स्वराज्य संस्था

ऊ) शिक्षण संचालक/सर्व विभागीय सह संचालक/ उप संचालक/ जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/ प्रौढ शिक्षण व अल्पसंख्यांक) कार्यालये व त्यांच्या अधिनस्त कार्यालये

ए) सर्व संचालक (उच्च शिक्षण,तंत्र शिक्षण, व्यवसाय विभाग, ग्रंथालये ) कार्यालये व त्यांच्या अधिनस्त कार्यालये,

ऐ) महाराष्ट्र राज्यातील केंद्र सरकारची सर्व कार्यालये व आस्थापना आणि महाराष्ट्र राज्यातील जनतेला बँकींग, दूरध्वनी, टपाल, विमा, रेल्वे, मेट्रो, मोनोरेल, विमान प्रवास, गॅस, पेट्रोलियम, कराधान,पारपत्र इत्यादी सेवा पुरविणारी अन्य कार्यालये.

३. या कार्यक्रमांकरीता येणारा खर्च प्रत्येक वित्तीय वर्षात त्या त्या संबंधित विभागाने/कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणाऱ्या आर्थिक तरतूदीतून अदा करावा.

४. सर्व साहित्य संस्थांकडून वरीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना समन्वय अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. समन्वय अधिकारी यांनी होणाऱ्या कार्यक्रमाची क्षणचित्रे आपल्या संकेतस्थळावर अद्यावत करुन त्यास व्यापक प्रसिध्दी द्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२११२२२१६४१०३७४३३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MILIND BHAGWAN GAWADE

Digitally signed by MILIND BHAGWAN GAWADE
Date: 2021.12.22 16:42:4x +05'30'

( मिलिंद गवादे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३) मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

४) मा.मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

५) विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद/विधानसभा, विधानमंडळ, मुंबई (पत्राने)

६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य/मराठी भाषा समिती सदस्य, विधानमंडळ, मुंबई (पत्राने)

७) सर्व विभागीय आयुक्त

८) सर्व जिल्हाधिकारी

९) कुलगुरु, सर्व विद्यापीठे

१०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

११) शिक्षण संचालक (प्राथमिक /माध्यमिक/उच्च माध्यमिक/प्रौढ शिक्षण व अल्पसंख्यांक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२) संचालक (उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, व्यवसाय शिक्षण, ग्रंथालये ), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई (पत्राने),
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
१५) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
१७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
१९) महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२१) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२२) भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई,
२३) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२४) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२५) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२६) सर्व विभागीय सहायक भाषा संचालक, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नवी मुंबई,
२७) कार्यकारी अधिकारी, आकाशवाणी केंद्र, एच.टी.पारेख मार्ग, आमदार निवास समोर, चर्चगेट, मुंबई-४०००२०
२८) कार्यकारी अधिकारी, दूरदर्शन केंद्र वरळी,पांडुरंग बुधकर मार्ग, बी.डी.डी.चाळ, वरळी, मुंबई
२९) सर्व केंद्रीय कार्यालयांची मुख्यालये /बँका, विमा कंपन्या व सार्वजनिक उपक्रम यांची मुख्यालये/ रेल्वे/विमान वाहतूक यांची मुख्यालये
३०) सर्व मंत्रालयीन विभाग
३१) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
३२) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद
३३) विदर्भ साहित्य संघ, नागपूर
३४) कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी
३५) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर
३६) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई.
३७) निवडनस्ती (भाषा-२).